# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.२५/०६/२०२४

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी गुरुत्व वाहिनीचे कटई नाका ते शीळ टाकी येथे तातडीचे दुरुस्तीचे काम करण्याकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) 24 तासांचा शटडाऊन घेतल्यामुळे गुरुवार दि.27/06/2024 रोजी रात्री 12:00 वा. ते शुक्रवार दि.28/06/2024 रोजी रात्री 12:00 वाजेपर्यंत (24 तास) मिरा-भाईंदर शहरास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) होणारा पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहील. तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यंत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(शरद नानेगांवकर)<br>
कार्यकारी अभियंता<br>
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग<br>
मिरा-भाईंदर महानगरपालिका